# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/11/2021 (गुरूवार)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत गोंडेगाव डुमरी रोड येथे दिनांक 10/11/2021 चे 11.00 वा. ते 11.45 वा. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी कामठी यांच्या सह फिर्यादी नामे– पो.शि. धनराज चौरपगार व इतर स्टाफ हे गोंडेगाव, नांदगाव, येसंबा येथे पेट्रोलींग करीत होते. दरम्यान गोंडेगाव डुमरी रोड येथे एमच–40/बीएल–3888 क्रमांकाचा टिप्परचा चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक आरोपी क्र.1. नसीम मोहम्मद नजिर, वय 30 वर्ष, रा. बीबी कॉलनी कामठी व आरोपी क्र. 2. एमच–40/बीएल–3888 क्रमांकाचा टिप्परचा मालक नामे– सुशांत काळे, रा. कामठी यांनी संगणमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या 4 ब्रास रेती किं. 12,000/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 10,12,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई धनराज चौरपगार यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राहुल रंगारी हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील नांदगाव येथील पंप हाउस येथे फिर्यादी नामे– राजु गोविंदा ढोरे वय 43 वर्ष रा. केटीपीएस कॉलनी कोराडी हे खापरखेडा पॉवर प्लॉट येथे अतिरिक्त अभियंता म्हणुन काम पाहत असून त्यांचे कंपनीचा कंत्राटी पध्दतीने ट्रान्सफार्मर नांदगाव येथे पंपहाउस मध्ये लावलेले आहे. फिर्यादी यांचे सुपर वायझर यांनी फोन करून सांगितले की, 'पंप हाउस येथे करंट ट्रान्सफार्मर चोरीला गेले आहे' असे सांगितलेवरून फिर्यादी घटनास्थळी गेले असता येथे बसविलेल तीन ट्रान्सफार्मर पैकी दोन चे बुशींग पडलेले दिसले व त्यातील तांब्याचे वायर दिसले नाही व ट्रान्सफार्मर दिसला नाही. अज्ञात आरोपीने दिनांक 03/11/2021 चे 06.00 वा. ते 07/11/2021 चे 12.00 वा. दरम्यान ट्रान्सफार्मर कि. 70,000/– रू. चोरून नेल्याचे तक्रार दिल्याने फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राहुल रंगारी हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील वलनी माईन येथे दिनांक 10/11/2021 चे 03.00 वा. चे दरम्यान वलनी माईन्स गावा शिवारातील लागुन असलेल्या इंडस कंपनीचा पॉवर केबल एयरटेल कंम्पनीचा 30 मिटर चे 4 तुकडे 120 मिटर आणी आय डी आय कम्पनीचा 30 मिटर चे 10 तुकडे 300 मीटर ऐकुण 420 मीटर पॉवर केबल किमती अंदाजे 25,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आशिष नरसिंगराव खंडागळे, वय 33 वर्ष, रा. श्रीकृष्ण अपार्टमेन्ट अंबाझरी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास तपास पोलिस हवालदार सुर्यभान जळते मो न 9673837007 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. काटोल :– दिनांक 08/11/2021 चे 10:00 वा. ते 17.00 वा. चे सुमारास वय 16 वर्षीय पीडित/ फिर्यादी अल्पवयीन मुलगी हिला आरोपी क्र. 1) नितीन रमेश चरकारे वय 28 वर्ष रा पंचवटी काटोल व 2) सनी उर्फ अक्षय कैलास प्रजापती वय 26 वर्ष रा काळे चौक काटोल यांनी तिला गिफट देणार असे अमिष दाखवुन सोबत नेले. यानंतर आरोपी 2 याने त्याच्या मोटारसायकल वर बसविले व जलालखेडा शिवारात एका तुरीच्या शोतात नेवून पीडिते सोबत जबरी संभोग केला व कुणाला सांगितले तर जिवाने मारून टाकण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 376(2)(जे),363,114,34 भादंवि. सहकलम 4, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. आगासे मो. नं. 8446283925 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 9 कि. मी. अंतरावरील मौजा निमतलाई येथे दिनांक 09/11/2021 चे 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अल्केश आंनदराव नेहारे वय 27 वर्ष रा खुबाळा ता. सावनेर याने आपली एमएच– 40/बीपी– 3613 क्रमांकाची मोटरसायकल ही मंडई कार्यक्रम असल्याने निमतलाई येथे आत्याचे घरा समोर उभी करून मंडई पाहन्या करिता गेला होता. तेव्हा अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 35,000/–रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गंगाधर ठाकरे मो.नं. 9923908382 हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

पो. स्टे. काटोल :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील मौजा पेठबुधवार काटोल येथे दिनांक 10/11/21 चे 07.30 वा. दरम्यान फिर्यादी हे आपले शेतात गेले असता शेतातील कामगार मृतक नामे– नरेश इंगळे, वय, वय 32 वर्ष रा. येरला धोटे ता. काटोल हा शेतातील विहीरीच्या पाण्यात तंरगतानी मृत अवस्थेत दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जयप्रकाश नंदकिशोर जैस्वाल, वय 58 वर्ष, रा. ऑरेंज प्लाजा चे बाजूला बसस्टॅन्ड जवळ काटोल यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नाईक गौरव आगकर हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावरील राहते घरी पेठबुधवार काटोल येथे दिनांक 10/11/21 चे 05.00 वा. पुर्वी फिर्यादीचे पती हे फिर्यादी ला म्हटले की, "तु मुलाला घेवुन थोडी बाहेर जा, मला झोपायचे आहे" तर यावरून फिर्यादी हि बाहेर निघुन गेली. त्यादरम्यान फिर्यादीचे पती सिध्दार्थ राजेन्द्र पलकंडवार (मृतक),वय 25 वर्ष रा. पेठबुधवार काटोल याने घरातील लोखंडी रॉडला दुप्पटयाने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रीमती प्रिया सिध्दार्थ पलकंडवार वय 25 वर्ष रा. पेठबुधवार काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक राजेश रेवतकर मो. क्र. 9921882557 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर